ISSN 2231-2137

# CONTEMPORARY RESEARCH IN INDIA

A Peer-Reviewed Multi-Disciplinary International Journal
UGC Approved Journal No. 62441, NAAS Score 2018 : 3.23
Impact Factor 2016 : 0.956 (GIF)



ॐ श्री

श्री भारत शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

माऊली महाविद्यालय, वडाळा ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर (महाराष्ट्र) व विद्यापीठ अनुदान आयोग आयोजित

—— एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र ——


# ॥ संत साहित्याचे योगदान ॥

विशेष अंक

संत तुकाराम बिज, शनिवार ३ मार्च २०१८








Scanned by CamScanner

# CONTENTS


| Sr. No. | Title of the Article | Page No. |
|---|---|---|
| 1 | भक्ती परंपरेतील स्त्री साहित्याचे योगदान<br>प्रा. डॉ. असिया चिश्ती | 01 |
| 2 | संत साहित्य : सर्वांगी स्पर्श करणारे तत्त्वज्ञान<br>डॉ. प्रदीप औजेकर | 04 |
| 3 | 'संत एकनाथांचे साहित्यातील योगदान: एक दृष्टीक्षेप'<br>प्रा. सौ. सुवर्णा वैभव यमगर | 06 |
| 4 | महाराष्ट्रातील सूफी आणि दत्त संप्रदायाचे वाङ्मयीन योगदान<br>प्रा. टकले गणेश प्रल्हादराव | 09 |
| 5 | "संत साहित्यातील विश्वात्मकता' व सर्वधर्मसमभाव...!"<br>प्रा. डॉ. मधुकर गणेश मोकाशी | 11 |
| 6 | "संत साहित्यातील सामाजिक मूल्ये"<br>प्रा. पसरकल्ले एस. पी. | 14 |
| 7 | संत जनाबाई यांच्या अभंगातील सामाजिक दृष्टिकोन व वाङ्मयीन वैशिष्ट्ये<br>प्रा. परमेश्वर हटकर | 16 |
| 8 | महाराष्ट्रातील भक्ती चळवळीचे योगदान<br>डॉ. रमेश शिंदे | 19 |
| 9 | संत साहित्य आणि समाज प्रबोधन<br>डॉ. जनार्धन परकाळे | 22 |
| 10 | भक्तीपरंपरेतील स्त्रीसाहित्याचे योगदान<br>श्री. डॉ. अनिल बांगर, | 24 |
| 11 | संत साहित्य आणि समाजप्रबोधन<br>प्रा. डॉ. नवनाथ दणाणे | 27 |
| 12 | "संत साहित्यातील संत कवयित्रींच्या रचना–एक अभ्यास"<br>प्रा. व्यवहारे एस. टी. | 30 |
| 13 | संत कवयित्री - निर्मळाबाई<br>प्रा. सोनवले राजकुमार रंगनाथ | 33 |
| 14 | संत एकनाथांचे सामाजिक कार्य<br>श्री. सुहास बापू मोरे | 35 |
| 15 | संत साहित्याच्या निर्मिती प्रेरणा<br>प्रा. सौ. स्वाती माने-थिटे | 37 |
| 16 | संतसाहित्यातील भाषिक व मुल्यविचार : संशोधन संधी<br>प्रा. नानासाहेब महादेव गव्हाणे | 40 |
| 17 | वारकरी संप्रदायातील स्त्रियांचे योगदान<br>भागवत लहुबुवा ढोले | 42 |
| 18 | संत साहित्याची सार्वकालिकता<br>डॉ. दत्तात्रय महादेव डांगे व डॉ. विद्या विजय नावडकर | 44 |
| 19 | **मराठी भाषेचे नवनीत – समग्र तुकाराम**<br>**श्री. अनिलकुमार राजाराम पाटील** | 47 |
| 20 | सुधारणावादी पुरोगामी संत : गाडगेबाबा<br>प्रा. डॉ. लहू वाघमारे | 48 |
| 21 | संत साहित्यातील जातीयता...<br>प्रा. गौतम गायकवाड | 52 |
| 22 | सांस्कृतिक पर्यावरण आणि मध्ययुगीन स्त्रीवादाचे चित्रण<br>प्रा. डॉ. दत्तात्रय प्रभाकर डुंबरे | 56 |
| 23 | "नाथांचा धर्म आणि साहित्यातून समाज प्रबोधन"<br>प्रा. डॉ. अनिता प. खंडागळे | 61 |




Scanned by CamScanner

| | |
|---|---|
| 72 | संत तुकारामाच्या अभंगातुन सामाजिक जाण<br>कु. सुप्रिया कृष्णा माने |
| 73 | "अमीर खुसरो : दखनी सुफी कवी"<br>प्रा. डॉ. शकील शेख |
| 74 | संत साहित्याचे संचितः 'वारी'<br>प्रा. सुनिता गोरख रोकडे |
| 75 | "संतांची दखनी कविता"<br>प्रा. डॉ. इ. जा. तांबोळी |
| 76 | म. बसवेश्वर आणि संत नामदेवः समता व मानवतावादाचे आधारस्तंभ<br>प्रा. डॉ. विशाल प्र. लिंगायत |
| 77 | संत साहित्याचे योगदान<br>श्वेता तुकाराम डंबरे |
| 78 | ''वारकरी चळवळ आणि संत साहित्य''<br>सौ. सुमंगला विजय बाकरे |
| 79 | लोकशिक्षक संत तुकाराम<br>स्वाती महाळंक |
| 80 | "मराठी और हिंदी संत साहित्य में सामाजिक मूल्य"<br>प्रा. आमलपूरे सुर्यकांत विष्वनाथ |
| 81 | मध्यकालीन हिंदी संत काव्य की प्रासंगिकता संत नामदेव का हिंदी साहित्य में योगदान<br>प्रा. डॉ. बालाजी गरड |
| 82 | हिंदी साहित्य में संत साहित्य का योगदानः संत नामदेव की उपासना पध्दति<br>प्रा. एम. जी. कांबळे |
| 83 | हिंदी निर्गुण संत कवि का समकालीन महत्व<br>प्रा. डॉ. साळुंखे मनिषा नामदेव |
| 84 | जीवन की महिमा के गायक : संत कनकदास<br>डॉ. संगिता सूर्यकांत चित्रकोटी |
| 85 | संत कबीर : साहित्य, समाजसुधार और वर्तमान परिप्रेक्ष्य<br>प्रा डॉ संजय नाईनवाड |
| 86 | संत कबीरः एक आंदोलन<br>डॉ. सतीश अर्जुन घोरपडे |
| 87 | महाशिवयोगिनी अक्क महादेवी की भक्ति - साधना<br>प्रा. सिध्दाराम पाटील |
| 88 | गुजरात में सौराष्ट्र की मीराबाई के रूप में प्रसिद्ध दलित भक्त संत कवि दासी जीवण<br>प्रा. डॉ. ए. डी. चावड़ा |
| 89 | वंदनीय राष्ट्रसंत तुकड़ोजी महाराज का संत साहित्य और समाज प्रबोधन<br>डॉ. गजानन रणदिवे |
| 90 | संत कबीर और संत वेमन्ना के काव्य का तुलनात्मक अध्ययन<br>प्रा. ममता बोल्ली |
| 91 | ವಾರಕರಿ ಪಂಥ ಮತ್ತು ದಾಸ ಪಂಥ Varakari sect & Dasa sect<br>(ಸಂತ ಜ್ಞಾನೇಶ್ವರ ಮತ್ತು ಭಕ್ತ ಪುರಂದರದಾಸರನ್ನು ಅನುಲಕ್ಷಿಸಿ) Case study of Saint Jnaneshwar & Bhakta Purandaradas<br>ಡಾ. ವಿಠಲರಾವ್ ಟಿ. ಗಾಯಕ್ವಾಡ್ Dr. Vittalarao T. Gaikwad |
| 92 | Basveshwara: A Visionary Crusader and Eradicator of Caste System<br>Dr. Suryawanshi P. L. |
| 93 | Role of Varkari Saints and Their Influence on Contemporary Society<br>Mr. Tulshiram L. Dabde |
| 94 | Protestant Spirit in Saint Tukaram`s Abhangs<br>Dr. Raut Sunil Raosaheb |




Scanned by CamScanner

Contemporary Research in India (ISSN 2231-2137): UGC Approved Journal No. 62441 - NAAS Score 2018: 3.23

# म. बसवेश्वर आणि संत नामदेवः समता व मानवतावादाचे आधारस्तंभ

प्रा. डॉ. विशाल प्र. लिंगायत, (मराठी विभाग) सहायक प्राध्यापक,
एस बी झाडबुके महाविद्यालय, बार्शी जि. सोलापूर

CONTEMPORARY RESEARCH IN INDIA ISSN 2231 - 2137
Received: 17/01/2018 | Edited: 25/01/2018 | Accepted & Published: 03/03/2018

## प्रस्तावना

मध्ययुगीन कालखंड हा भक्तिपरंपरेने भारलेला आणि लोक प्रबोधनातून वाटचाल करणारा असा एक कालखंड म्हणून परिचित आहे. या कालखंडात मध्ययुगीन संतांनी केलेले भक्ती आंदोलन हे धर्म व्यवस्थेच्या विरोधी केलेले सगळयात मोठे आंदोलन होते, लढा होता. ७ व्या व ८ व्या शतकातील धर्मव्यवस्थेविरुध्दचा हा लढा महाराष्ट्र व कर्नाटकच्या भूमीवर पोहोचण्यास चार-पाच शतके जावी लागली. कर्नाटकात या आंदोलनाचे नेतृत्व महात्मा बसवेश्वर व इतर संतांनी केले तर महाराष्ट्रात या आंदोलनाचे नेतृत्व संत नामदेवादी संतांनी केले. या काळात ज्या काही थोर महनीय संतांचा उदय झाला, त्यांनी आपल्या समाजाला व धर्मबांधवांना एका अंधःकारमय व अस्थिर अशा परिस्थितीतून बाहेर काढले. आजच्या आधुनिकतेच्या व ग्लोबलायझेशनच्या युगात संत साहित्य कालबाह्य झाल्याची किंवा त्याच्या अभ्यासाची फारशी गरज राहीली नसल्याचे बोलेले जाते. परंतु संत साहित्याचा अभ्यास हा तर्कशुध्द पध्दतीने केला तर हे लक्षात येते की, संत साहित्य नेहमी समाजाभिमुख असल्याने जीवनातली अनेक सत्ये आजही या साहित्याद्वारे उलगडू शकतात. अशा या मध्ययुगीन काळात मराठी वाङ्मय व इतिहासाचा मागोवा घेतांना संशोधनाला व शोधाला वाव असणारे तसेच दुर्लक्षित राहिलेले असे अनेक विषय आहेत, त्यापैकीच लिंगायत धर्मातील म. बसवेश्वर आणि वारकरी संप्रदायातील संत नामदेव समता व मानवतावादाचे आधारस्तंभ हा शोधविषय मी निवडला. या दोन्ही संतांच्या कालखंडामध्ये काही शतकांचे अंतर (दिडशे वर्षे) असूनही त्यांच्या वचन-अभंगांतील, रचनेतील, तत्वज्ञानातील साम्य भेद तसेच त्यांच्या कार्यपध्दतीतील समानता शोधण्याचा एक अल्पसा प्रयत्न मी केला आहे.

महात्मा बसवेश्वरांच्या वचनकाव्याची उंची ही हिमालयाएवढी असून त्याची व्याप्ती जीवनाच्या सर्व अंगांना स्पर्श करणारी आहे. बसवेश्वरांच्या वचनांनी ज्याप्रमाणे कन्नड साहित्यात अतिशय मोलाची भर घातली त्याप्रमाणेच संत नामदेवांच्या अभंगरुपी काव्याविष्काराने मराठी साहित्यात अतिशय मोलाची भर घातली आहे. महात्मा बसवेश्वर हे मध्ययुगीन काळातील समतेचा व मानवतेचा एक नवा अध्याय निर्माण करणारे संत म्हणून उदयास आलेले एक महान संघटक होते. तर संत नामदेव हे वारकरी पंथाची शिकवण समाजाच्या शेवटच्या थरापर्यंत पोहोचविण्याचे ध्येय बाळगून कार्य करणारे एक थोर संत होते. या दोन्ही संतांच्या व्यक्तिमत्वावर व कर्तृत्वावर त्या विशिष्ट काळाचा व्यापक परिणाम झालेला आहे. त्यामुळेच बसवेश्वरांची भूमिका ही नेहमी आक्रमक, बंडखोर व क्रांतिकारक अशी राहिलेली आहे. तर नामदेवांची भूमिका काहीशी मवाळ, समन्वयवादी व मितभाषी अशी आहे. या दोन्ही संतांनी आपल्या समता व मानवतावादी दृष्टिकोनातून भाषावाद, प्रांतवाद धर्मवाद यांच्या भिंती ओलांडून आपला समतावादी विचारांचा झेंडा संपूर्ण भारतात पसरविण्याचे जे कार्य केले ते अलौकिक स्वरुपाचे असे आहे. बसवेश्वरांचे कार्य हे मूलभूत व रचनात्मक स्वरुपाचे असून समाज परिवर्तनाचा विचार लोकमानसात पेरणारे आहे. तर नामदेवांच्या कार्यातून सदाचाराचा व माणुसकीचा दृष्टिकोन व्यक्त झालेला आहे.

संत नामदेव हे भक्तिमार्गाचे प्रवर्तक व प्रचारक होते. ज्ञानेश्वरांनी निर्माण केलेल्या तत्वज्ञानाला त्यांनी अतिशय सुगम पध्दतीने सामान्य माणसांपर्यंत पोहोचविण्याचे कार्य केले. तर याच प्रकारच्या जीवनदृष्टीचा साक्षात्कार बसवेश्वरांच्या वचन काव्यातूनही व्यक्त झाला आहे. महात्मा बसवेश्वर हे मध्ययुगीन भारताच्या सामाजिक, धार्मिक व राजकीय जीवनातील एक परिवर्तनवादी युगपुरुष होते. त्यांच्या वचनांनी ज्याप्रमाणे सर्वसामान्य लोकांचे प्रबोधन केले. त्यांना नवविचारांची जी दिशा दाखविली व लिंगायत धर्म सुसंघटीत करण्याचे जे कार्य केले, त्याप्रमाणेच नामदेवांच्या अभंगांनी केवळ पांडुरंगालाच नव्हे तर उभ्या महाराष्ट्राला वेड लावले. देवळाच्या संभामंडपात होणारे कीर्तन त्यांनी चंद्रभागेच्या वाळवंटावर नेण्याचे अविश्वसनीय अशा स्वरुपाचे कार्य केले. नामदेवांनी आपल्या कार्य व कर्तृत्वाद्वारे लोकमानसात सर्वांभोवती प्रेमभाव, दया, क्षमा, शांती व समता, मानवतावादाचाच पुरस्कार केला आहे. या दोन्ही संतांच्या मानवतावादी विचारांतील साम्यभेद बघतांना बसवेश्वरांनी माणसाच्या प्रयत्नवादालाच देव मानले. कर्मालाच धर्म मानले व कायकातून कैलास निर्माण करण्याचे जे अद्‌भुत कार्य केले त्यास खरोखरच तोड नाही. यात माणूस हाच त्यांच्या जीवनकार्याचा केंद्रबिंदू होता. तर विश्वात्मक भावाच्या विचारांचा प्रसार हे नामदेवांच्या अभंगाचे मुख्य उद्दिष्ट होते. हे संपूर्ण विश्व एक आहे, मला अनेक व्हावेसे वाटते. हा विचार नामदेवांच्या विचारसरणीचा गाभा आहे. बसवेश्वरांच्या रुपाने बाराव्या शतकात समतावादी तत्वज्ञानाचा पाया घालणाऱ्या अनुभव मंटपात अठरापगड जाती-जमातींचा वर्ग एकत्र आला व एका वेगळ्या अध्यात्मिक लोकशाहीची सुरुवात झाली. तर नामदेवांच्या रुपाने १३ व्या व १४ व्या शतकात लोकशाहीचा पुरस्कार करणारी समतावादी तत्वज्ञान सांगणारी एक परंपरा पंढरपुरच्या विठ्ठल मंदिरात निर्माण झाली. चंद्रभागेच्या वाळवंटात ही भक्ती परंपरा खऱ्या अर्थाने दृढमूल झाली. १२ व्या शतकातील बसवेश्वरांच्या कार्य कर्तृत्वामुळे 'अनुभवमंटप' हे असे ज्ञानाचे एक संस्कारपीठ म्हणून उदयाला आले. त्याप्रमाणे तेराव्या व चौदाव्या शतकातील नामदेवांच्या भक्तिभावामुळे 'पंढरपूर' हे भक्तीचे विचारपीठ म्हणून उदयास आले.

महात्मा बसवेश्वरांचे वेगळेपण हे आहे की, त्यांनी चातुर्वर्ण्य, कर्मकांड, स्वर्ग-नरक, स्पृश्य-अस्पृश्य, देव-देवळे, पाप-पुण्य या संकल्पना



Scanned by CamScanner

ग्रंथ सूची

१. मदार हे.वी., 'अभंग नवनीत', ब्लू बर्ड इंडिया, पुणे, द्वि.आ. ऑक्टो-२००७
२. ळेकर सुहासिनी, 'संत साहित्यः एक रुपवेध', उन्मेष प्रकाशन, पुणे, प्र.आ., ऑक्टो-२०११
३. दोंकर वि.रा., 'सांस्कृतिक संचित', मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, प्र.आ., १९८७
४. नडे मु.श्री., 'संत नामदेवः काव्यदर्शन', स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, प्र.आ., २००१
५. कुलकर्णी गो.म., 'संत साहित्यः काही निरीक्षणे', मेहता पब्लिकेशन, पुणे, १९९४
६. ढेरे रा.चिं., 'संत, लोक आणि अभिजन', पुनर्मुद्रण, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, जुलै, २००५
७. ठाण यु.म., 'नामयाची अभंगवाणी', रजत प्रकाशन, औरंगाबाद, प्र.आ., जाने. २००४
८. फडकुले निर्मलकुमार, 'संत साहित्य- सौंदर्य आणि सामर्थ्य', स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद, प्र.आ., जून-२००५
९. पुणरे सुर्यकांत, 'वीरशैव व इतर धर्म आणि समाज', साधना बुक स्टॉल, गडहिंग्लज, कोल्हापूर, द्वि.आ., फेब्रु-२०००
१०. बिराजदार भिमाशंकर, 'संत तुकाराम आणि म. बसवेश्वर यांच्या भक्तिकाव्याचा तुलनात्मक अभ्यास', अनुप प्रकाशन, सोलापूर, प्र.आ., डिसें-२००६



Scanned by CamScanner